-: प्रकरण पाचवे :-

# सहकारी संस्था आणि स्त्रियांचा विकास

## (Co-operatives And Development Of Women)

## ◉ प्रकरण पाचवे ◉

# सहकारी संस्था आणि स्त्रियांचा विकास

## (Co-operatives And Development of Women)

**प्रास्ताविक (Introduction) :-**

यापूर्वी तिसऱ्या प्रकरणात आपण वारणानगरमधील चार प्रमुख महिला सहकारी संस्थांचा थोडक्यात परिचय करून घेतला आहे. त्यानंतर चौथ्या प्रकरणात प्रस्तुत संशोधनाची संशोधन पद्धती स्पष्ट केली आहे.

सदर अभ्यासासाठी सहेतुक नमुना निवड केली आहे. या सहकारी संस्थांमधील १०० महिला उत्तरदात्यांची निवड केली आहे. या प्रकरणात आपण निवडलेल्या नमुन्यातील १०० उत्तरदात्यांकडून मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीच्या आधारे सहकारी संस्था स्त्रियांच्या विकासात कोणती भूमिका पार पाडतात हे समजुन घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

सदर प्रकरणात तीन स्थूल विभाग करण्यात आले आहेत. पहिल्या विभागात उत्तरदात्यांच्या सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी विषयीचे वर्णन आहे. दुसऱ्या विभागात उत्तरदात्यांच्या कामाच्या ठिकाणची परिस्थिती कशी आहे, याविषयीचे विवेचन आहे. तर तिसऱ्या विभागात सहकारी संस्थांमुळे स्त्रियांचा आर्थिक आणि सामाजिक दर्जा कसा बदलला आहे याविषयीच्या उत्तरदात्यांच्या प्रतिक्रियांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

प्रारंभी आपण अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्यांतील स्त्रियांच्या सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीचा परिचय करून घेऊ.

## I) उत्तरदात्यांची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी (Respondents' Socio-Economic Background) :-

मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने उत्तरदात्यांचे राहण्याचे ठिकाण, वय, वैवाहिक दर्जा, कुटुंबाचा प्रकार, कुटुंबातील सदस्य संख्या, जात, धर्म, शैक्षणिक दर्जा, आर्थिक उत्पन्न इ. परिवर्त्यांबाबत माहिती संकलित करण्यात आली. सदर माहितीचे वर्गीकरण आणि विश्लेषण करून उत्तरदात्यांच्या सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीचे वर्णन खाली दिले आहे.

### A) उत्तरदात्यांचे राहण्याचे ठिकाण (Place of Residence of Respondents) :-

उत्तरदात्यांच्या राहण्याच्या ठिकाणानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक १ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक ५.१**

**उत्तरदात्याच्या राहण्याच्या ठिकाणावरून वर्गीकरण**

| अ. नं. | राहण्याचे ठिकाण | वारंवारिता | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | वारणानगर | ५१ | ५१ |
| २. | इतर गांवे | ४९ | ४९ |
| **एकूण** | | **१००** | **१००** |

सारणी क्रमांक ५.१ मधील माहितीवरून असे दिसून येते की, बहुतांशी महिला (५१%) वारणानगर या ठिकाणी राहणाऱ्या आहेत तर उर्वरित म्हणजे (४९%) महिला ह्या वारणानगरच्या आसपासच्या गावातून वारणानगर येथील सहकारी संस्थांत काम करण्यास येत आहेत.

विविध सहकारी संस्थांमध्ये काम करणाऱ्या 'इतर गावातून' येणाऱ्या महिला या कोडोली, अमृतनगर, पारगांव, तळसंदे, वाठार, काखे, बहिरेवाडी, सत्यवती कॉलनी, जाखले, पोखले, केखले या गावांहून ये-जा करतात.

वरील माहितीवरून हे स्पष्ट होते की, वारणानगर येथील सहकारी संस्थांमुळे केवळ वारणानगरमधील महिलांचाच नव्हे तर आजुबाजूच्या खेड्यांमधील महिलांना आर्थिक मोबदला मिळवून देणारे काम उपलब्ध झाले आहे. ग्रामीण महिलांचा आर्थिक क्षेत्रातील सहभाग वाढविण्यास सहकारी संस्थांनी प्रोत्साहन दिले आहे, असे यावरून म्हणता येईल.

**B) <u>वय (Age)</u> :-**

सारणी क्रमांक २ मध्ये उत्तरदात्यांच्या वयोगटानुसार वर्गीकरण स्पष्ट केले आहे.

**<u>सारणी क्रमांक ५.२</u>**

**<u>उत्तरदात्यांच्या वयोगटानुसार वर्गीकरण</u>**

| अ. नं. | वयोगट (वर्षे) | वारंवारिता | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | २० ते ३५ | ६० | ६० |
| २. | ३६ ते ५० | ३५ | ३५ |
| ३. | ५१ ते ६० | ५ | ५ |
| **एकूण** | | **१००** | **१००** |

सारणी क्रमांक ५.२ मधील माहितीवरून स्पष्टपणे दिसून येते की, वारणानगरमधील महिलांच्या सहकारी संस्थांत तरून (२० ते ३५ वर्षे) वयोगटातील महिला संख्येने सर्वाधिक (६०%) असून त्या खालोखाल मध्यम वयोगटातील (३६ ते ५० वर्षे) महिला (३५%) आहेत तर (५१ ते ६० वर्षे) वयोगटातील स्त्रिया अत्यल्प (५%) आहेत.

वरील माहितीवरून दोन बाबी ठळकपणे लक्षात येतात. एक म्हणजे सहकारी संस्थांनी तरूण वयोगटातील स्त्रियांना घराबाहेर पडून आर्थिक क्षेत्रात सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. वस्तूत: ग्रामीण भागामध्ये स्त्रियांवर, त्यांच्या हालचालींवर अनेक

प्रकारची नियंत्रणे असतात. वयाने तरूण असणाऱ्या स्त्रियांवर अशी बंधने अधिक कडक असतात. ग्रामीण भागातील तरूण वयोगटातील स्त्रियांच्या हालचालीवरील गतिशीलतेवरील बंधने हळूहळू शिथिल होत आहेत, असे वरील माहितीवरून सूचित होते.

### C) वैवाहिक दर्जा (Marital Status) :-

सारणी क्रमांक ५.३ मध्ये उत्तरदात्यांच्या वैवाहिक दर्जानुसार वर्गीकरण केले आहे.

**सारणी क्रमांक ५.३**

**उत्तरदात्यांच्या वैवाहिक दर्जानुसार वर्गीकरण**

| अ. नं. | वैवाहिक दर्जा | वारंवारिता | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | विवाहित | ९४ | ९४ |
| २. | अविवाहित | ६ | ६ |
| एकूण | | १०० | १०० |

सारणी क्रमांक ५.३ मधील माहितीवरून असे स्पष्टपणे दिसून येते की, वारणानगरमधील महिलांच्या सहकारी संस्थांमध्ये काम करणाऱ्या महिलांमध्ये प्रामुख्याने विवाहित महिलांचाच भरणा अधिक (९४%) आहे. केवळ (६%) महिला ह्या अविवाहित आहेत.

ग्रामीण भागामध्ये वयाने तरूण असलेल्या विवाहित स्त्रियांवर घराबाहेर पडण्यास अनेक बंधने असल्याचे सामान्यत: दिसुन येते. पण सदर अभ्यासातील उत्तरदात्यांमध्ये वयाने तरूण असलेले उत्तरदाते अधिक आहेत. हे सारणी क्रमांक ५.२ मधील माहितीवरून दिसून आले आहे.

सारणी क्रमांक ५.३ मधील माहितीवरून उत्तरदात्यांमध्ये विवाहित स्त्रियांचे प्राबल्य असल्याचे दिसुन येते. या दोन्ही बाबी एकत्रित विचारात घेतल्यावर असे म्हणता येईल की, सहकारी संस्थांच्या स्थापनेमुळे आणि स्त्रियांना अशा संस्थात सहभागी होण्याची संधी मिळाल्यास स्त्रियांवरील पारंपारिक बंधने शिथिल होतात.

**D) <u>कुटूंबाचा प्रकार (Type of Family)</u> :-**

सारणी क्रमांक ५.४ मध्ये उत्तरदात्यांचे कुटूंबाच्या प्रकारानुसार वर्गीकरण केले आहे.

**<u>सारणी क्रमांक ५.४</u>**

**<u>उत्तरदात्यांच्या कुटूंब प्रकारानुसार वर्गीकरण</u>**

| अ. नं. | कुटूंबाचा प्रकार | वारंवारिता | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | विभक्त कुटूंब | ५३ | ५३ |
| २. | एकत्र कुटूंब | ४७ | ४७ |
| **एकूण** | | **१००** | **१००** |

सारणी क्रमांक ५.४ मधील माहितीवरून हे स्पष्ट होते की, बहुसंख्य (५३%) उत्तरदाते हे विभक्त कुटूंबातील आहेत तर उर्वरित (४७%) उत्तरदात्यांना एकत्र कुटूंबाची पार्श्वभूमी लाभली आहे.

कौटुंबिक पार्श्वभूमीच्या बाबतीत टक्केवारीत लक्षणीय फरक दिसून येत नाही. उत्तरदाते प्रामुख्याने ग्रामीण भागातील आहेत. हे लक्षात घेता एकत्र कुटूंबाची पार्श्वभूमी असणाऱ्या स्त्रिया अधिक प्रमाणात दिसून येतील असे संशोधकाला वाटत होते. पण वरील माहितीवरून असा स्पष्ट संकेत मिळतो की, ग्रामीण भागातही आता एकत्र कुटूंब संस्था मोडकळीस येत असून विभक्त कुटूंबाचे प्रमाण वाढत आहे. हे फारसे आश्चर्यकारक नाही. कारण बहुतांशी स्त्रिया वारणानगर येथील राहणाऱ्या आहेत. आणि त्यापैकी बहुतेकांची मुळची कुटूंबे सोडून नोकरी निमित्त कुटूंबातील सदस्य वारणानगर येथे येऊन स्थायिक झाले आहेत.

अर्थात वारणानगरमधील राहणाऱ्या काही उत्तरदात्यांना एकत्र कुटूंबाची पार्श्वभूमी आहे. त्याचप्रमाणे खेड्यातून कामानिमित्त वारणानगरला ये-जा करणाऱ्या उत्तरदात्यांनाही विभक्त कुटूंबाची पार्श्वभूमी आहे.

वरील माहितीवरून हे सुचित होते की, ग्रामीण भागामध्ये पूर्वी प्रस्थापित झालेल्या एकत्र कुटूंब पद्धतीला आता तडे जात आहेत आणि पती, पत्नी आणि मुले यांचा समावेश असणारी विभक्त कुटूंबे अस्तित्वात येत आहेत. अशा विभक्त कुटूंबातून स्त्रियांना अधिक स्वातंत्र्याचा लाभ मिळताना दिसून येत आहे. त्यामुळेच अशा कुटूंबातील स्त्रिया नोकरीनिमित्त घराबाहेर पडत आहेत.

### E) <u>कुटूंबाचा आकार (Size of Family)</u> :-

यापूर्वी आपण पाहिल्याप्रमाणे ग्रामीण भागातील कुटूंबाच्या संरचनेत बदल घडून येत आहेत. म्हणजे एकत्र कुटूंब पद्धती मोडकळीस येऊन विभक्त कुटूंब पद्धती ग्रामीण भागात रूढ होऊ पहात आहे.

सारणी क्रमांक ५.५ मध्ये उत्तरदात्यांच्या कुटूंबातील सदस्यांच्या संख्येवरून वर्गीकरण केले आहे. सदर वर्गीकरण करताना २ ते ५ सदस्यांच्या कुटूंबाला 'लहान कुटूंब' ६ ते ८ सदस्य संख्या असणाऱ्या कुटूंबाला 'मध्यम' आकाराचे कुटूंब तर ९ ते १२ सदस्य असणाऱ्या कुटूंबाला 'मोठे कुटूंब' समजण्यात आले आहे.

**<u>सारणी क्रमांक ५.५</u>**

**<u>उत्तरदात्यांच्या कुटूंबाच्या आकारमानानुसार वर्गीकरण</u>**

| अ. नं. | कुटूंबाचा आकार | वारंवारिता | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | 'लहान कुटूंब' (२ ते ५ सदस्य) | ६२ | ६२ |
| २. | 'मध्यम कुटूंब' (६ ते ८ सदस्य) | ३३ | ३३ |
| ३. | 'मोठे कुटूंब' (९ ते १२ सदस्य) | ५ | ५ |
| **एकूण** | | **१००** | **१००** |

सारणी क्रमांक ५.५ मधील माहितीवरून असे दिसून येते की, सर्वाधिक उत्तरदाते 'लहान' (२ ते ५ सदस्य) कुटूंबातील असुन त्या खालोखाल 'मध्यम' (६ ते ८ सदस्य) आकाराची

कुटूंबे आहेत. तर केवळ (५%) उत्तरदाते सापेक्षत: 'मोठ्या' (९ ते १२ सदस्य) असणाऱ्या कुटूंबातील आहेत.

वरील माहितीवरून असे दिसून येते की, कुटूंबाच्या केवळ संरचनेत बदल होत नसून त्यांच्या आकारमानातही बदल होत आहे. ग्रामीण भागातील लोकांनाही आता छोट्या कुटूंबाचे महत्त्व पटलेले दिसून येत आहे. त्यामुळेच २ ते ५ सदस्य असणाऱ्या कुटूंबाचे प्राबल्य दिसून येते.

मुलाखतील माहितीवरून असे दिसून आले की, उत्तरदात्यांचा कल स्वत:चे कुटूंब मर्यादित ठेवण्याकडे आहे.

**F) जात (Caste) :-**

सारणी क्रमांक ५.६ मध्ये उत्तरदात्यांचे जातीनुसार वर्गीकरण केले आहे.

**सारणी क्रमांक ५.६**

**उत्तरदात्यांचे जातीनुसार वर्गीकरण**

| अ. नं. | जात | वारंवारिता | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | मराठा | ६२ | ६२ |
| २. | ब्राम्हण | ८ | ८ |
| ३. | लिंगायत-वाणी | ७ | ७ |
| ४. | मांग | ७ | ७ |
| ५. | महार | ३ | ३ |
| ६. | नामदेव शिंपी | ३ | ३ |
| ७. | चांभार | १ | १ |
| ८. | गुरव | ३ | ३ |
| ९. | इतर | ६<br>ख्रिश्चन ३<br>मुस्लिम २<br>धनगर १ | ६ |
| **एकूण** | | **१००** | **१००** |

सारणी क्रमांक ५.६ वरून असे दिसून येते की, उत्तरदात्यांमध्ये मराठा जातीच्या स्त्रियांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे (६२%) आहे. त्या खालोखाल ब्राम्हण (८%), लिंगायत-वाणी (७%), मांग (७%), महार (२%), नामदेव शिंपी (३%), चांभार (१%) व इतर (ख्रिश्चन (३%), मुस्लिम (२%), धनगर (१%) उत्तरदाते असे प्रमाणे आहे).

एकंदर महाराष्ट्रात तसेच वारणानगर परिसरातील ग्रामीण भागातील लोकसंख्येत मराठा जातीच्या सदस्यांची संख्या अधिक आहे. सहकारी संस्थांच्या उभारणीत या संस्थांच्या सदस्यांमध्ये देखील मराठा जातीच्या सदस्यांचेच प्राबल्य दिसून येते. या पार्श्वभूमीवर उत्तरदात्या महिलांमधील मराठा जातीच्या सदस्यांचेच प्रमाण अधिक असणे फारसे आश्चर्यकारक नाही. वरील सारणीतील माहितीवरून दिसून येणारी ठळक बाब म्हणजे या सहकारी संस्थांनी जवळपास सर्वच जातींमधील स्त्रियांना अर्थार्जन करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.

या परिसरातील वरीष्ठ, मध्यम आणि कनिष्ठ स्तरांमधील विविध जातींच्या स्त्रिया या संस्थांमध्ये आहेत. यावरून सहकारी संस्था या जाती-जातीतील पारंपारिक बंधने झुगारून देणाऱ्या संस्था आहेत. असा निष्कर्ष निघतो. एवढेच नव्हेतर सहकारी संस्थांत विविध जातींच्या स्त्रियांना एकत्र काम करण्याची परस्परांशी आंतरक्रिया करण्याची संधी मिळत असल्याने पारंपारिक जातीय पूर्वग्रह कमी हो ऊन जाती-जातींमध्ये सलोख्याचे संबंध निर्माण होण्यास चालना मिळत आहे.

### G) धर्म (Religion) :-

सारणी क्रमांक ५.७ मध्ये उत्तरदात्याचे धर्मावरून वर्गीकरण केलेले आहे.

**सारणी क्रमांक ५.७**

**उत्तरदात्यांचे धर्मानुसार वर्गीकरण**

| अ. नं. | धर्म | वारंवारिता | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | हिंदू | ९५ | ९५ |
| २. | ख्रिश्चन | ०३ | ०३ |
| ३. | मुस्लिम | ०२ | ०२ |
| | **एकूण** | **१००** | **१००** |

सारणी क्रमांक ५.७ वरून असे दिसून येते की, उत्तरदात्यांमध्ये हिदूधर्मीय स्त्रिया सर्वाधिक प्रमाणात (९५%) असून त्या खालोखाल ख्रिश्चन (३%) व मुस्लिम (२%) स्त्रिया आहेत.

उत्तरदात्यांमध्ये हिंदू स्त्रियांचे प्रमाण अधिक असणे फारसे आश्चर्यकारक नाही. कारण कोडोली-वारणानगर परिसरात इतर धर्मांच्या तुलनेत हिदू धर्मीयांचे प्रमाण अधिक आहे. त्याखालोखाल ख्रिश्चन व मुस्लिमांची संख्या आहे.

या महिला सहकारी संस्थांमधून हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन या धर्माच्या स्त्रिया नोकरी करित असल्यामुळे या संस्थांच्या बाबतीत धर्मनिरपेक्षता जाणवते. या संस्था धर्म निरपेक्ष दृष्टिकोन ठेऊन कार्य करणाऱ्या आहेत याचेच हे निदर्शक आहे.

**H) शिक्षण (Education) :-**

सारणी क्रमांक ५.८ मध्ये उत्तरदात्यांचे शैक्षणिक दर्जावरून वर्गीकरण केले आहे.

**सारणी क्रमांक ५.८**

**उत्तरदात्यांच्या शैक्षणिक दर्जानुसार वर्गीकरण**

| अ. नं. | शैक्षणिक पात्रता | वारंवारिता | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | अशिक्षित | १४ | १४ |
| २. | इयत्ता ७ वी पर्यंत | ३४ | ३४ |
| ३. | इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंत | ३० | ३० |
| ४. | ११ वी १२ वी पर्यंत | ७ | ७ |
| ५. | पदवी प्रथमवर्ष ते पदवीपर्यंत | १३ | १३ |
| ६. | पदव्युत्तर शिक्षण (एम.ए., एम. कॉम.) | २ | २ |
| **एकूण** | | **१००** | **१००** |

सारणी क्रमांक ५.८ वरून खालील प्रमुख निरीक्षणे नोंदविता येतील.

१) महिला सहकारी संस्थांमध्ये अशिक्षित स्त्रियांपासून ते पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या स्त्रियांना अर्थार्जनाची संधी उपलब्ध झाली आहे.

२) ८६% महिला सुशिक्षित आहेत आणि निरक्षरांचे प्रमाण अत्यल्प (१४%) आहे.

३) बहुतांशी महिला १० वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या (३४ + ३० = ६४) आहेत.

वरील माहितीवरून असे दिसून येते की, त्या-त्या संस्थातील कामाच्या स्वरूपानुसार विभिन्न शैक्षणिक पार्श्वभूमी लाभलेल्या स्त्रियांना सहकारी संस्था आर्थिक क्रियांत सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देऊ शकतात.

**I) <u>वार्षिक उत्पन्न (Annual Income)</u> :-**

उत्तरदात्यांच्या सरासरी वार्षिक उत्पन्नानुसार त्यांचे वर्गीकरण सारणी क्रमांक ५.९ मध्ये सादर केले आहे.

**<u>सारणी क्रमांक ५.९</u>**

**<u>उत्तरदात्यांच्या कुटूंबातील सरासरी वार्षिक उत्पन्नानुसार वर्गीकरण</u>**

| अ. नं. | कुटुंबाचे सरासरी वार्षिक उत्पन्न | वारंवारिता | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | रू. २०,००० पर्यंत | १४ | १४ |
| २. | रू. २०,००१ ते रू. ५०,००० पर्यंत | ७५ | ७५ |
| ३. | रू. ५०,००१ ते रू. १,००,००० पर्यंत | ११ | ११ |
| **एकूण** | | **१००** | **१००** |

सारणी क्रमांक ५.९ मधील माहितीवरून असे दिसून येते की, बहुसंख्य (७५%) उत्तरदाते रू. २०,००१ ते रू. ५०,००० वार्षिक उत्पन्न गटातील आहेत. त्या खालोखाल रू.

२०,००० पर्यंत उत्पन्न असणारे (१४%) उत्तरादाते आहेत. तर रू. ५०,००१ ते रू. १,००,००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणारे (११%) उत्तरदाते आहेत.

वरील वर्गीकरण उत्तरदात्यांनी पुरविलेल्या माहितीवर आधारित आहे. वरील माहितीवरून असे दिसून येते की, जवळजवळ सर्वच उत्तरदाते दारिद्र्य रेषेवरील आहेत. मुलाखत अनुसूचीतील माहितीचे बारकाईने निरीक्षण केले असता असे दिसून आले की, १०० पैकी केवळ एकच उत्तरदात्याच्या कुटूंबाचे सरासरी वार्षिक उत्पन्न रू. ११,००० पेक्षा कमी होते.

उत्तरदात्यांपैकी सुमारे ९५% उत्तरदात्या महिलांचे पती वारणानगर येथील विविध सहकारी संस्थांमध्ये कर्मचारी किंवा कनिष्ठ पातळीवरील अधिकारी आहेत. त्यामुळे ही उत्तरदात्यांची कुटूंबे दारिद्र्य रेषेवरील असणे अगदी स्वाभाविक आहे.

वारणानगर येथील सहकारी संस्थांनी पती-पत्नी दोहोंनाही अर्थार्जनाची संधी उपलब्ध करून दिली आहे. ही नोंद घेण्यासारखी बाब आहे.

## II) उत्तरदात्यांच्या कामाच्या ठिकाणची परिस्थिती (Working Conditions) :-

मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने उत्तरदात्यांचे कामाचे ठिकाण, उत्तरदात्यांना नोकरी कशी मिळाली, नोकरीचा दर्जा, आर्थिक मिळकत, नोकरीचा कालावधी, अन्य सेवा-सुविधा, स्त्री व पुरूष वेतनातील फरक इ. परिवर्त्यांबाबत माहिती संकलित करण्यात आली. सदर माहितीचे वर्गीकरण आणि विश्लेषण करून उत्तरदात्यांच्या कामाच्या ठिकाणच्या परिस्थितीचे वर्णन पुढीलप्रमाणे दिले आहे.

### A) उत्तरदात्यांचे कामाचे ठिकाण (Respondents Working Place) :-

सारणी क्रमांक ५.१० मध्ये उत्तरदात्यांच्या कामाच्या ठिकाणावरून वर्गीकरण केले आहे.

## सारणी क्रमांक ५.१०

## उत्तरदात्यांच्या कामाच्या ठिकाणावरून वर्गीकरण

| अ. नं. | उत्तरदात्यांचे कामाचे ठिकाण (संस्थेचे नांव) | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | श्री वारणा महिला गृहउद्योग लिज्जत पापड केंद्र, वारणानगर | ५० | ५० |
| २. | श्री वारणा भगिनी मंडळ, वारणानगर | १२ | १२ |
| ३. | श्री वारणा महिला सहकारी पतसंस्था लि., वारणागनगर | ५ | ५ |
| ४. | श्री वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळ लि., वारणानगर (वारणा-बझार) | ३३ | ३३ |
| | **एकूण** | **१००** | **१००** |

सारणी क्रमांक ५.१० मधील माहितीवरून असे दिसून येते की, निवडलेल्या उत्तरदात्या महिलांमधील सर्वाधिक महिला (५०%) श्री वारणा महिला गृहउद्योग लिज्जत पापड केंद्र, वारणानगर या ठिकाणी काम करणाऱ्या आहेत. त्या खालोखाल (३३%) महिला या श्री वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळ लि., वारणानगर (वारणा-बझार) या ठिकाणी काम करणाऱ्या आहेत तसेच श्री वारणा भगिनी मंडळ, वारणानगर या ठिकाणी काम करणाऱ्या (१२%) महिला आहेत आणि श्री वारणा महिला सहकारी पत संस्था लि. वारणानगर या ठिकाणी काम करणाऱ्या (५%) महिला आहेत. ह्या १०० उत्तरदात्या कर्मचाऱ्यांची निवड ही त्या-त्या सहकारी संस्थांमधील वेगवेगळ्या विभागातून केलेली आहे.

ह्या चार महिला सहकारी संस्थांच्या माध्यमातून महिला कर्मचाऱ्यांची या संस्थेमधील प्रत्यक्षात कामाची पार्श्वभूमी काय आहे हे संशोधकाने अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे.

श्री वारणा महिला गृहउद्योग लिज्जत पापड केंद्रामधील ५० उत्तरदात्या महिला ह्या पीठ-प्रक्रिया विभाग (पीठ मळण व गोळे करणे), पीठ वितरण विभाग, पापड पॅकिंग विभाग, क्वालिटी कंट्रोल विभाग, मजुरी विभाग इ. विविध विभागातील काम करणाऱ्या आहेत.

श्री वारणा भगिनी महामंडळातील १२ महिला ह्या माल निवडणे विभाग, सफाई विभाग, खाद्यपदार्थ तयार करणारा विभाग, मालाची क्वॉलिटी कंट्रोल विभाग, पॅकिंग विभाग, दरपत्रके (दराची लेबल पॅकींग वरती लावणे) इ. कामामध्ये व्यस्त असणाऱ्या आहेत.

श्री वारणा महिला सहकारी पतसंस्थेमधील ५ महिला या शेअर्स विभाग, ठेव विभाग, कर्ज व्यवहार विभाग, पिग्मी ठेव व डेली पोस्टींग विभाग, पत्र व्यवहार, पिग्मी एजंट यासारख्या विविध विभागात काम करणाऱ्या आहेत.

तसेच श्री वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळ, वारणानगर (वारणा-बझार) या ठिकाणीच्या ३३ महिला ह्या गोडाऊन विभाग (खरेदी केलेल्या मालाची नीट-निवड करणे, वजन करणे, पॅकींग करणे, लेबल लावणे इ. कामे करणाऱ्या आहेत.) सेल्स विभाग, अकौंटस् विभाग, प्रशासन विभाग इ. विभागातून निवडलेल्या आहेत.

अशाप्रकारे संशोधकाने वरील वेगवेगळ्या महिला सहकारी संस्थांमधील महिलांची त्या-त्या संस्थेमधील वेगवेगळ्या विभागातून वेगवेगळ्या कामाच्या स्वरूपावरून निवड केली आहे.

**B) <u>नोकर भरतीचे स्वरूप (Mode of Recruitment)</u> :-**

सारणी क्रमांक ५.११ मध्ये उत्तरदात्यांच्या नोकरभरतीच्या स्वरूपावरून वर्गीकरण केले आहे.

## सारणी क्रमांक ५.११

## उत्तरदात्यांच्या नोकर भरतीच्या स्वरूपावरून वर्गीकरण

| अ. नं. | नोकरभरतीचे स्वरूप | वारंवारिता | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | वारणा विविध उद्योग समुहात पती नोकरीस असलेमुळे चेअरमन यांच्या ओळखीने | ६२ | ६२ |
| २. | रोजगार कार्यालयामार्फत (Employment Through) | १ | १ |
| ३. | विक्रेता प्रशिक्षण कोर्स करून | ६ | ६ |
| ४. | शैक्षणिक पात्रता व मुलाखत घेऊन | ६ | ६ |
| ५. | कामाच्या अनुभवावरून | २५ | २५ |
| | **एकूण** | **१००** | **१००** |

सारणी क्रमांक ५.११ वरून स्पष्टपणे दिसून येते की, चार सहकारी संस्थांमध्ये नोकरी मिळालेल्या महिलांपैकी सर्वाधिक महिला (६२%) ह्या त्यांचे पती वारणानगरमधील वेगवेगळ्या उद्योग समुहामध्ये नोकरीस असल्यामुळे तसेच त्यांची चेअरमनसाहेबांशी ओळख असल्यामुळे नोकरीस घेतलेल्या आहेत. त्या खालोखाल (२५%) महिलांना त्यांच्या पूर्वीच्या कामाचा अनुभव असल्याने सहकारी संस्थेत नोकरी मिळाली आहे. तसेच (६%) महिला या विक्रेता प्रशिक्षण कोर्स प्रथम क्रमांकामध्ये पास झालेल्यापैकी आहेत व शैक्षणिक पात्रता पाहून व मुलाखत घेऊन त्याआधारे (६%) महिलांना रोजगाराची संधी प्राप्त झाली आहे.

### C) नोकरीचा दर्जा (Employment Status) :-

सारणी क्रमांक ५.१२ मध्ये उत्तरदात्यांच्या नोकरीच्या दर्जावरून वर्गीकरण केले आहे.

## सारणी क्रमांक ५.१२

## उत्तरदात्यांच्या नोकरीच्या दर्जावरून वर्गीकरण

| अ. नं. | नोकरीचा दर्जा | वारंवारिता | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | रोजंदारी नोकर | ५६ | ५६ |
| २. | कायम नोकर | ४४ | ४४ |
| **एकूण** | | **१००** | **१००** |

सारणी क्रमांक ५.१२ वरून असे दिसून येते की, उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक महिला (५६%) या रोजंदारी कर्मचारी आहेत तर त्याखालोखाल (४४%) महिला या कायम स्वरूपी नोकरीस आहेत.

रोजंदारीवर असणाऱ्या महिलांचे प्रमाण अधिक असल्याचे कारण असे की, त्यापैकी ५० स्त्रिया या श्री वारणा महिला गृहउद्योग लिज्जत पापड केंद्र, वारणानगर याठिकाणी काम करणाऱ्या असून त्यांनी किती किलोचे पापड तयार केले यावरून त्यांना मजुरी मिळते तर उर्वरित ६ स्त्रिया ह्या वारणा बझारमधील गोडाऊन विभागातील आहेत.

### D) उत्तरदात्या महिलांची आर्थिक मिळकत (Women's Economic Income):-

सारणी क्रमांक ५.१३ मध्ये उत्तरदात्या महिलांच्या आर्थिक मिळकतीनुसार वर्गीकरण केले आहे.

## सारणी क्रमांक ५.१३

## उत्तरदात्या महिलांचे आर्थिक मिळकतीनुसार वर्गीकरण

| अ. नं. | सहकारी संस्था | महिन्याची सरासरी मिळकत | वारंवारिता | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|---|
| १. | श्री वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळ लि., वारणानगर येथील रोजंदारीवरील महिला | रू. १२०० पर्यंत (दररोज ४० रू. प्रमाणे मजूरी) | ६ | ६ |
| २. | श्री वारणा महिला गृहउद्योग लिज्जत पापड केंद्र वारणानगर येथील रोजंदारीवरील महिला | रू. १२०० ते १८०० पर्यंत (दररोज ४० ते ६० रू. प्रमाणे मजूरी) | ५० | ५० |
| ३. | चारी संस्थांमधील (पापड केंद्र, भगिनी मंडळ, पतसंस्था, वारणा बझार) मासिक वेतनावर काम करणाऱ्या महिला | रू. ८५० ते ३७०० (मासिक सरासरी पगार) | ४४ | ४४ |
| | **एकूण** | | **१००** | **१००** |

सारणी क्रमांक ५.१२ मधील माहितीवरून आपण पाहिले आहे की, उत्तरदात्यांमधील सर्वाधिक महिला (५६%) ह्या रोजंदारी तत्त्वावर काम करित आहेत व बाकी उर्वीरत महिला (४४%) ह्या कायमस्वरूपी नोकरीस आहेत.

रोजंदारीवर पापड केंद्रामध्ये काम करणाऱ्या महिलांना दररोजच्या होणाऱ्या पापडावर दर किलोस १२ रू. प्रमाणे मजूरी दररोज रोख दिली जाते. या महिला दररोज सरासरी ४ ते ५ किलोचे पापड लाटतात. पापड लाटण्यासाठी घरातील इतर महिलांची, मुलींची मदत होत असते. त्यामुळे घरातील इतर महिलांचा वेळ हा वाया न जाता योग्य कामी खर्ची पडतो. त्यामुळे त्यांना देखील कामाची सवय लागते व कामातून आनंद मिळतो. या महिलांना दररोज सरासरी ४० ते ६० रूपयांपर्यंत

मजूरी मिळते म्हणजे महिन्याकाठी या महिलांना १२०० ते १८०० रूपयांपर्यंत मजूरी मिळते म्हणून पापड केंद्रामध्ये काम करणाऱ्या महिला या रोजंदारी नोकर वर्गात मोडतात.

तसेच श्री वारणा भगिनी मंडळ, वारणानगर, श्री वारणा महिला सहकारी पतसंस्था, वारणानगर व वारणाबझार या ठिकाणच्या महिला कर्मचाऱ्यांना रू. ८५० पासून ते ३७०० रूपयांपर्यंत मासिक पगार मिळतो व कामाच्या वेळेवरून मिळतो म्हणून वरील तिन्ही महिला संस्थेतील महिला कर्मचारी ह्या कायमस्वरूपी नोकर वर्गात मोडतात.

हे उत्तरदात्यांनी दिलेल्या मुलाखती अनुसूचीवरून स्पष्ट झाले आहे.

**E) नोकरीचा कालावधी (Length of Service) :-**

सारणी क्रमांक ५.१४ मध्ये उत्तरदात्यांच्या नोकरीच्या कालावधीनुसार वर्गीकरण केले आहे.

**सारणी क्रमांक ५.१४**

**उत्तरदात्यांच्या नोकरीच्या कालावधीवरून वर्गीकरण**

| अ. नं. | नोकरीचा कालावधी | वारंवारिता | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | १ वर्षापर्यंत | ५ | ५ |
| २. | १ वर्षापासून ते ५ वर्षांपर्यंत | ३१ | ३१ |
| ३. | ६ वर्षांपासून ते १० वर्षांपर्यंत | २८ | २८ |
| ४. | ११ वर्षांपासून ते १५ वर्षांपर्यंत | १९ | १९ |
| ५. | १६ वर्षांपासून ते २५ वर्षांपर्यंत | १७ | १७ |
| | **एकूण** | **१००** | **१००** |

सारणी क्रमांक ५.१४ वरून असे दिसून येते की, ३६ महिला वगळता उर्वरित सर्व महिलांना (६४%) ५ वर्षांहून अधिक काळ या सहकारी संस्थांमधील कामाचा अनुभव आहे.

F) **कामाचे स्वरूप (Working Position) :-**

संशोधकाने अभ्यासलेल्या वारणानगरमधील ह्या चार महिला संस्थेतील १०० उत्तरदात्या महिलांचे कामाचे स्वरूप हे वेगवेगळ्या संस्थेत वेगवेगळ्या स्वरूपाचे असल्याचे आढळून येते. त्यांच्या कामाचे वर्गीकरण संस्थावार खालीलप्रमाणे करता येईल.

श्री वारणा महिला गृहउद्योग लिज्जत पापड केंद्रामधील महिला (५०%) या पापडाचे पीठ मळणे, त्याचे गोळे करणे, पापडाच्या पिठाचे वाटप करणे, पापड लाटणे, पापडाचे चेकींग करणे, पापड करणे, पापडाची मजूरी देणे इ. कामामध्ये व्यस्त असतात.

श्री वारणा भगिनी मंडळामधील महिला (१२%) या ऑर्डरप्रमाणे खाद्यपदार्थ तयार करणे, फराळाचे ताजे पदार्थ तयार करणे, त्यांचे व्यवस्थित पॅकिंग करणे, सभासदांच्या विनंतीनुसार आवश्यक ती माहिती त्यांना पुरविणे अशा स्वरूपाची कामे करतात.

तसेच श्री वारणा विभाग ग्राहक सहकारी मंडळ लि., वारणानगर (वारणा-बझार) या ठिकाणच्या महिला (३३%) ह्या गोडाऊनमधील खरेदी केलेल्या मालाची निट निवड करणे, ऑर्डरप्रमाणे वस्तूंचे वजन करणे, पॅकिंग करणे, पॅकींग पिशवीवरती वजनाचे व दराचे लेबल लावणे अशा प्रकारची कामे करतात. तसेच सेल्स विभागातील महिला ह्या मालाची विक्री करण्याचे काम करतात तर अकौंटस विभागातील महिला ह्या हिशेब तपासणी, मालाची आवक-जावक, नफा-तोटा अंदाजपत्रके तयार करण्याचे काम करतात.

थोडक्यात वरील माहितीवरून हे स्पष्ट होते की, प्रत्येक संस्थेतील कामाचे स्वरूप हे वेगवेगळे आहे.

G) **कामाची वेळ (Duty Timing) :-**

श्री वारणा महिला गृहउद्योग लिज्जत पापड केंद्र, वारणानगर या संस्थेची कामाची वेळ ही पहाटे ५ वाजलेपासून सकाळी ९ वाजेपर्यंत असते. सकाळची एवढी वेळ झाल्यानंतर महिला

दिवसभर आपले घरगुती काम करण्यास मोकळ्या राहू शकतात. पापडाचे पीठ हे सकाळी जेंव्हा महिला तयार पापड केंद्रात जमा करावयास येतात तेंव्हाच उद्याच्या दिवसाचे पापडाचे पीठ दिले जाते. त्यामुळे एकाच वेळेस दोन्ही कामे होत असतात. त्यामुळे महिलांना ही वेळ सोयीस्कर वाटते. पापडाचे पीठ महिला घरी घेऊन जातात व पापड आपापल्या घरी, घरचे काम-धंदा सांभाळून करत असतात. त्यामुळे पापड केंद्राची ही वेळ सर्व महिलांना योग्य वाटते.

श्री वारणा भगिनी मंडळ, वारणानगर या संस्थेची कामाची वेळ ही सकाळी ९ ते सायंकाळी ६ पर्यंत असते व या वेळेमध्येच दुपारी १ ते २ या वेळेत जेवणाची सुट्टी असते. यामुळे या ठिकाणी काम करण्यास येणाऱ्या महिलांना आपले घरातील काम हे सकाळी आवरून कामावर वेळेवर हजर राहता येते. त्यामुळे या ठिकाणी काम करणाऱ्या महिलांना कामाची वेळ व तास योग्य वाटते.

श्री वारणा महिला पतसंस्थेतील सर्वच उत्तरदात्या महिलांना त्यांच्या कामाची वेळ व तास योग्य वाटतात. कारण या पतसंस्थेची कामाची वेळ ही ११.०० ते ६.०० असल्यामुळे कामावर हजर होण्याअगोदर घरची सर्व कामे आवरता येतात व त्यातूनही उरलेली कामे ही घरी आल्यानंतर करता येतात त्यामुळे त्यांना ही नोकरीची वेळ योग्य वाटते.

श्री वारणा विभाग ग्राहक सहकारी मंडळ, वारणानगर (वारणा बझार) या संस्थेची कामाची वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत आहे. या ठिकाणच्या ३३ महिला उत्तरदात्यांपैकी २३ महिला उत्तरदात्यांना कामाची वेळ योग्य वाटते व उर्वरित १० टक्के महिलांना कामाची वेळ व कामाचे तास योग्य वाटत नाहीत. कारण वारणानगर किंवा जवळच्या गावातील राहणाऱ्या महिलांना कामावर ये-जा करण्यास जास्त उशीर लागत नाही. पण बाहेर गावाहून येणाऱ्या महिलांना कामाची वेळ व तास योग्य वाटत नाही. कारण सुट्टी झालेनंतर घरी जाण्यास फार उशीर होतो व सकाळी देखील घरातील काम अर्ध्यातच टाकून गडबडीने कामावर यावे लागते. त्यामुळे १०% महिला उत्तरदात्यांना संस्थेची कामाची वेळ व तास योग्य वाटत नाही.

थोडक्यात वरील स्पष्टीकरणावरून दिसून येते की, वरील चारी संस्थातील काम करणाऱ्या महिलांपैकी सर्वाधिक म्हणजे ८९% महिलांना त्यांच्या कामाची वेळ व तास योग्य वाटतात व उर्वरित ११% महिलांना कामाची वेळ व तास योग्य वाटत नाहीत.

### H) <u>पगाराव्यतिरिक्त अन्य सेवा-सुविधा</u> :-

संशोधकाने निवडलेल्या १०० उत्तरदात्या महिला ह्या वारणानगरमधील वेगवेगळ्या चार महिला सहकारी संस्थांमध्ये काम करित आहेत.

यापैकी पापड केंद्रामध्ये काम करीत असणाऱ्या महिलांना वर्षभरात केलेल्या पापडावरती म्हणजे जेवढे जास्त किलो पापड लाटले जातात त्याच्यावरती बक्षीस दिले जाते. परगावाहून पापड घालण्यास येणाऱ्या महिलांना पापड केंद्रापर्यंत येण्या-जाण्यासाठी केंद्रामार्फत मोफत बससेवा आहे. तसेच वर्षातून १ वेळा सर्व महिलांची केंद्रामार्फत मोफत आरोग्य तपासणी केली जाते.

श्री वारणा भगिनी मंडळातील महिलांना दिवाळीच्या वेळेस पगाराच्या प्रमाणात व नोकरीच्या कालावधीच्या प्रमाणात बोनस व बक्षीस दिले जाते व दिवाळीसाठी मंडळामार्फत काही भेटवस्तू दिल्या जातात. त्यांची वर्षातून १ वेळा आरोग्याची मोफत तपासणी केली जाते.

श्री वारणा महिला सहकारी पत संस्थेतील महिला कर्मचाऱ्यांना दिवाळीच्या वेळेस पगाराच्या व नोकरीच्या कालावधीच्या प्रमाणात बोनस दिला जातो व इतर पतसंस्थेतील असणाऱ्या नियमाप्रमाणे रजा व आठवड्याची सुट्टी दिली जाते.

वारणा बझार मधील महिला कर्मचाऱ्यांना पगाराव्यतिरिक्त दिवाळीच्या वेळेस बोनस दिला जातो व ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात पगाराच्या व नोकरीच्या कालावधीच्या प्रमाणात बक्षीस दिले जाते. तसेच प्रत्येक विभागाची मासिक विक्रीचा अंदाज ठरवलेला असतो. त्यापेक्षा जास्त जर विक्री झाली तर त्या प्रमाणात जादा इनसेंटीव्ह दिला जातो. आठवड्याची पगारी सुट्टी असते. तसेच मासिक

पगाराच्या प्रमाणात क्रेडिट कार्ड दिले जाते. त्यावरती त्या महिला वारणा-बझार मधील वस्तूंची खरेदी करू शकतात.

### I) स्त्रि व पुरूष वेतनातील भेद :-

संशोधकाने निवडलेल्या उत्तरदात्या महिला ह्या सर्व प्रामुख्याने महिला सहकारी संस्थांत काम करणाऱ्या आहेत. त्यामुळे या ठिकाणी सरासरी ९० ते ९५ टक्के महिलांचाच सहभाग आहे. पापड केंद्रासारख्या ठिकाणी २ पुरूष कर्मचारी वगळता सर्व महिला कर्मचारी आहेत. श्री वारणा भगिनी मंडळामध्ये १००% महिला कर्मचारी आहेत. तसेच वारणा महिला पतसंस्था व वारणा बझारमध्ये ८०% पेक्षा जास्त महिला कर्मचारी आहेत.

थोडक्यात वरील चारी संस्थात काम करणाऱ्या महिलांचे प्रमाण सर्वाधिक आहे व पुरूषांचे प्रमाण अत्यल्प आहे. म्हणून त्यांना दिल्या जाणाऱ्या पगारात कोणताही फरक नाही. स्त्री व पुरूष यांच्या नोकरीचा कालावधी व कामाचे स्वरूप यावरून पगार निश्चित करण्यात आला आहे. त्यामध्ये पुरूष म्हणून जास्त पगार व स्त्री म्हणून कमी पगार असा कोणत्याही प्रकारचा भेदभाव नाही.

## III) सहकारी संस्था आणि महिलांचा आर्थिक आणि सामाजिक विकास (Co-operatives & Women's Economic and Social Development) :-

मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा आणि कौटुंबिक गरजांची पुर्ती, कुटूंबाचा समाजातील दर्जा वाढला आहे असे वाटते काय ? स्वत:च्या मिळकतीचा विनियोग करण्याचे स्वातंत्र्य महिलांना आहे का ? मिळकतीचा वापर महिला स्वत:साठी किती प्रमाणात करतात, आर्थिक स्वावलंबनामुळे महिलांच्या सामाजिक प्रतिष्ठेत वाढ झाली आहे काय ? आर्थिक स्वावलंबनामुळे महिलांच्या कुटूंबातील दर्जात बदल झाला आहे का ? राहणीमानातील बदल, नोकरीचा घरकामावरील परिणाम, नोकरी करणाऱ्या महिलांविषयीच्या घरातील पती तसेच अन्य कुटूंबातील व्यक्तिंच्या प्रतिक्रिया, सांस्कृतिक कार्यक्रमांचा महिलांवरील

प्रभाव, सहकारी संस्थातील सहभागामुळे महिलांमध्ये आणि त्यांच्या कुटूंबामध्ये झालेले बदल इ. परिवर्त्यांबाबत माहिती संकलित करण्यात आली. सदर माहितीचे वर्गीकरण आणि विश्लेषण करून उत्तरदात्यांच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाचे वर्णन पुढीलप्रमाणे करता येईल.

### A) आर्थिक परिस्थितीत सुधारणा आणि कौटूंबिक गरजांची पूर्ती :-

कुटूंबाच्या उत्पन्नात आपणास मिळणारा पगार अथवा मजूरी यांची भर पडल्यामुळे आपल्या कुटूंबाच्या आवश्यक गरजा (उदा. खाणे-पिणे, कपडा-लत्ता इ.) भागतात का ? असा प्रश्न विचारला असता महिला उत्तरदात्यांनी खालीलप्रमाणे उत्तरे सांगितली आहेत.

सारणी क्रमांक ५.१५ मध्ये नोकरीमुळे उत्तरदात्यांच्या कुटूंबाच्या आवश्यक गरजा भागतात का ? या प्रश्नाला मिळालेल्या उत्तरांचे वर्गीकरण केले आहे.

**सारणी क्रमांक ५.१५**

**उत्तरदात्यांच्या कुटूंबाच्या आवश्यक गरजा भागतात का ? यावरून वर्गीकरण**

| अ. नं. | उत्तरदात्यांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १. | कुटूंबाच्या आर्थिक गरजा बऱ्याच प्रमाणात भागतात | ४६ | ४६ |
| २. | कुटूंबाच्या आवश्यक गरजा काही प्रमाणात भागण्यास मदत होते | ४७ | ४७ |
| ३. | कुटूंबाच्या आवश्यक गरजा अत्यल्प प्रमाणात भागतात | ७ | ७ |
| **एकूण** | | **१००** | **१००** |

सारणी क्रमांक ५.१५ वरून असे दिसून येते की, उत्तरदात्यांमधील (४६%) महिलांच्या कुटुंबाच्या आवश्यक गरजा ह्या नोकरीच्या मिळालेल्या पैशातून बऱ्याच प्रमाणात

भागतात. तसेच ४७% महिलांच्या कुटूंबाच्या आवश्यक गरजा ह्या काही प्रमाणात भागण्यास मदत होते. तर उर्वरीत (७%) महिलांच्या कुटूंबाच्या आवश्यक गरजा या अत्यल्प प्रमाणात भागतात असे महिला उत्तरदात्यांनी मुलाखतीत सांगितले.

यावरून असे दिसून येते की, (४६%) महिलांच्या कौटुंबिक गरजा भागविण्यास त्यांच्या नोकरीची मोठी मदत झाली आहे. तर (४७%) महिलांच्या कुटूंबाच्या आवश्यक गरजा भागण्यास त्यांच्या पगारामुळे/मजुरीमुळे काही प्रमाणात मदत झाली आहे तर (७%) महिलांच्या कौटुंबिक आवश्यक गरजा ह्या पुरेशा प्रमाणात भागत नाहीत. कारण या महिलांच्या कुटूंबातील सदस्य संख्या ही जास्त आहे. तसेच या महिला रोजंदारी मजूरीवर काम करणाऱ्या आहेत. त्यामुळे त्यांना कमी मजूरी मिळते.

वरील विश्लेषणावरून असा निष्कर्ष काढता येईल की, सहकारी संस्थामुळे महिलांना आर्थिक उत्पन्नाचे साधन उपलब्ध झाले आहे.

उत्तरदात्या महिलांन सहकारी संस्थेत मजूरी/नोकरी मिळण्यापूर्वी या महिला प्रामुख्याने घरकामात व्यस्त होत्या. त्यांचा फावला वेळ शेजापाजाऱ्यांशी गप्पा मारण्यात जात असे, फावल्या वेळेचा सदुपयोग करण्यासाठी त्यांना आर्थिक उत्पन्नाचे साधन नव्हते. पण या महिलांना सहकारी संस्थेमध्ये नोकरी मिळाल्यामुळे पूर्वीच्या परिस्थितीपेक्षा त्यांच्या कुटूंबाची सध्याची आर्थिक परिस्थिती सुधारलेली आहे असे त्यांनी उत्तर दिले.

### B) <u>कुटूंबाचा समाजातील दर्जा वाढल्याची जाणीव</u> :-

उत्तरदात्या महिलांना कुटूंबाचा समाजातील दर्जा वाढला आहे का ? असा प्रश्न विचारला असता त्यांनी नोकरीमुळे त्यांच्या कुटूंबाला समाजात मानाचे, प्रतिष्ठेचे स्थान मिळाले आहे, समाजातील त्या कुटूंबाचा कौटुंबिक दर्जा सुधारलेला आहे असे सांगितले.

**C) मिळविलेल्या पैशाचा विनियोग करण्याचे स्वातंत्र्य महिलांना आहे का ? :-**

मिळवलेल्या पैशाचा विनियोग करण्याचे स्वातंत्र्य महिलांना आहे काय ? असा प्रश्न विचारला तेंव्हा या महिलांनी मिळणाऱ्या पगारातील, मजूरीतील पैशाचा वापर/विनियोग करण्याचे आर्थिक स्वातंत्र्य आहे, असे सर्व महिला उत्तरदात्यांनी सांगितले. हव्या त्या वस्तूंची खरेदी त्यांच्या मनाप्रमाणे त्या करू शकतात. पण या पैशातून आपण घरांसाठी आवश्यक अशाच वस्तूंची खरेदी करतो. त्यामुळे कुटूंबातील इतर व्यक्तींच्या अशा खरेदीस विरोध होत नाही असेही त्यांनी सांगितले.

**D) मिळकतीचा वापर महिला स्वत:साठी किती प्रमाणात करतात :-**

मिळविलेल्या आर्थिक मोबदल्याचा वापर तुम्ही स्वत:साठी करता काय ? असा प्रश्न महिला उत्तरदात्यांना विचारला होता. तेंव्हा नोकरीतून मिळालेल्या पैशाचा वापर फारच थोड्या महिला स्वत:च्या व्यक्तिगत गरजांच्या पूर्ततेसाठी करतात असे त्यांनी सांगितले. कांही महिला स्वत:साठी कपडे, सौंदर्य प्रसाधने, दाग-दागिने यासारख्या वस्तु खरेदी करतात. याउलट बऱ्याच महिला उत्तरदात्यांनी असे सांगितले की, कौटुंबिक कारणासाठीच आमच्या मिळकतीचा वापर होतो. त्यात मुलांच्या शिक्षणासाठी तसेच घरातील भावंडांच्या उच्च शिक्षणासाठी मिळविलेल्या पैशाचा वापर होतो. तसेच घरातील इतर व्यक्तींना लागणाऱ्या आवश्यक वस्तूंची, भांडी, कपडे इ. च्या खरेदीसाठी त्या महिला पैशाचा वापर करतात.

**E) नोकरीच्या संधीमुळे महिलांच्या सामाजिक प्रतिष्ठेत वाढ झाली आहे का? :-**

सहकारी संस्थांमध्ये मिळालेल्या नोकरीच्या संधीमुळे महिलांच्या प्रतिष्ठेत वाढ झाली आहे काय ? असा प्रश्न सर्वच महिला उत्तरदात्यांना विचारला होता तेंव्हा नोकरी मिळाल्यामुळे त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेत वाढ झाली आहे असे सर्व महिला उत्तरदात्यांनी सांगितले.

नोकरीमुळे समाजात मान-सन्मान मिळू लागला आहे असे त्यांना वाटते. विशेषत: इतर लोकांचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे अशी त्यांची भावना आहे. इतरांच्या नजरेत त्यांचे महत्त्व वाढल्याचे त्यांना जाणवते असे त्यांच्या मुलाखतीवरून जाणवले. समाजात पूर्वीपेक्षा अधिक किंमत मिळू लागली आहे. समाजातील सणा-समारंभादिवशी, एखाद्या कार्यक्रमासाठी त्यांना आवर्जुन निमंत्रण मिळत आहे व त्या ठिकाणी त्या आनंदाने समारंभात समाविष्ठ होत असतात. पूर्वीच्या घराबाहेर न जाणाऱ्या ''चूल व मूल'' एवढ्या पुरतेच मर्यादित क्षेत्र असलेल्या स्त्रियांना आता नोकरीमुळे समाजात वावरता येऊ लागले आहे. कुटूंबाबाहेर इतरत्र फिरण्यामुळे त्यांच्यातील भितीची भावना कमी झाली आहे.

**F) आर्थिक स्वावलंबनामुळे महिलांच्या कुटूंबातील दर्जात बदल झाला आहे काय? :-**

आर्थिक स्वावलंबनामुळे महिलांच्या कुटूंबातील दर्जात बदल झाला आहे काय ? असा प्रश्न महिला उत्तरदात्यांना विचारला होता तेंव्हा उत्तरदात्या महिलांच्या मुलाखतीतून हे स्पष्टपणे दिसून आले आहे की, एकूण १०० महिला उत्तरदात्यांपैकी ७७ महिला उत्तरदात्यांनी असे प्रतिपादन केले की, पूर्वी घरकामात त्यांना घरातील इतर लोक फारशी मदत करित नसत. पण आता कुटूंबातील इतर लोक घरकामात मदत करतात. पतीकडूनही सहकार्य मिळते. आम्हाला जशी आमच्या घरी वागणूक मिळते तशी नोकरी न करणाऱ्या स्त्रियांना मिळत नाही असेही त्यांनी सांगितले.

२३ महिला उत्तरदात्यांना नोकरी करण्यामुळे त्यांच्या कुटूंबातील वैयक्तिक दर्जामध्ये फारसा फरक पडल्याचे जाणवत नाही. कारण या महिला विभक्त कुटूंबातील असल्या कारणामुळे नोकरी करून घरी परत आल्यानंतर या महिलांना घरातील संपूर्ण कामे करावीच लागतात. काही वेळेस पती, मुले घरातील कामांमध्ये थोडीफार मदत करतात. परंतु जास्तीत जास्त कामे ही त्या स्त्रियांनाच करावी लागतात. त्यामुळे जरी त्या महिला नोकरीस असल्या तरी त्यांच्यावरती घरातील संपूर्ण

कामाचा बोझ हा असतोच पण पतीकडून आपणास पूर्वीपेक्षा सध्या चांगली वागणूक आणि सहकार्य मिळते असे त्यांनी सांगितले.

**G) राहणीमानातील बदल :-**

विविध सहकारी संस्थेतील नोकरीच्या संधीमुळे महिलांच्या पूर्वीच्या व आता सध्याच्या राहणीमानात फरक वाटतो काय ? असा प्रश्न महिला उत्तरदात्यांना विचारला होता तेंव्हा बहुसंख्य उत्तरदात्यांनी नोकरी लागण्यापूर्वीचे राहणीमान व नोकरी लागल्यानंतरचे सध्याचे राहणीमान यामध्ये अनेक बाबतीत बदल झालेला आहे असे सांगितले.

नोकरी लागण्यापूर्वी महिला या घरातील काम अगदी निवांतपणे त्यांच्या सवडीनुसार करत होत्या. कपड्यांची व आरोग्याची त्या वेळच्या वेळी काळजी घेत नसत. स्वत:चे तसेच कुटूंबातील व्यक्तींच्या आरोग्याविषयी, कपड्यांच्या स्वच्छतेविषयी त्या नीटपणे लक्ष देत नसत. पण नोकरी लागल्यामुळे त्यांना वेळेचे महत्त्व समजू लागले आहे. त्या वेळेवर आपल्या घरातील कामधंदा आटोपतात व आपल्या नोकरीच्या ठिकाणी वेळेवर हजर राहतात. कपड्यांची स्वच्छता, केसांचा नीटनेटकेपणा इ. बाबतीत त्यांच्यात बदल घडून आला आहे. त्याचबरोबर आपले स्वत:चे, तसेच कुटूंबातील इतर व्यक्तींच्या आरोग्याकडे, औषधोपरचाराकडे त्या व्यवस्थित रित्या काळजी घेत आहेत.

तसेच पूर्वी राहत असलेल्या घरांमध्ये अनेक विविध सोयी त्यांनी केलेल्या आहेत. घर बांधणी व घराची दुरूस्ती अशा प्रकारचे नवीन उपक्रम त्यांनी नोकरीमुळे राबविले आहेत. तसेच जीवनावश्यक साहित्य, भांडी, कपाटे, कपडालत्ता इ. गोष्टींची त्यांनी नोकरीच्या मिळालेल्या पैशामधून कुटूंबासाठी खरेदी केलेली आहेत.

थोडक्यात वरील विश्लेषणावरून नोकरीमुळे महिलांच्या पूर्वीच्या व सध्याच्या राहणीमानात फारच फरक असलेला आढळून आला आहे.

**H) नोकरीचा घरकामावरील परिणाम :-**

नोकरी करण्यामुळे घरकामावर परिणाम होता काय ? असा प्रश्न महिला उत्तरदात्यांना विचारला होता. त्यावेळी नोकरी करण्यामुळे बहुसंख्य महिलांची घरकामामध्ये ओढाताण होते असे त्यांनी सांगितले. उत्तरदात्या महिलांच्या मुलाखतीवरून असे दिसून आले की, २०% महिलांनी नोकरीमुळे त्यांच्या घरकामावर परिणाम झालेला आहे असे त्यांनी सांगितले कारण या महिला या विभक्त कुटूंबातील आहेत त्यामुळे त्यांना घरातील काम-धंदा स्वत:ला करूनच कामावर हजर रहावे लागते व उर्वरित काम हे कामावरून घरी परत गेल्यानंतर करावे लागते, त्याचबरोबर परगावाहून नोकरीसाठी येणाऱ्या महिलांना घरकामामध्ये अधिक ओढाताण होत असल्याचे त्यांनी सांगितले. घरातील काम संपूर्ण आटोपण्याची ईच्छा असूनही त्यांना वेळेअभावी काम अर्धवट टाकूनच कामावर हजर रहावे लागते.

५५% महिलांनी नोकरीमुळे त्यांच्या घरच्या इतर कामावर परिणाम होत नाही असे त्यांनी सांगितले. कारण या महिला ह्या एकत्र कुटूंबात राहणाऱ्या आहेत तसेच त्या वारणानगर या ठिकाण राहणाऱ्या आहेत. त्यामुळे त्यांना वेळेवर घरकाम आटोपून कामावर हजर राहता येते.

उर्वरित २५% महिलांनी त्यांच्या घरच्या कामावर थोड्या प्रमाणात परिणाम होत असल्याचे सांगितले. कारण या महिला नोकरीसाठी बाहेरील गावाहून येत आहेत व त्यांचे कुटुंब मध्यम आकाराचे आहे. त्यांच्या कुटूंबामध्ये ६ ते ८ सदस्य संख्या असल्याने घरातील कामामध्ये इतर व्यक्ती मदत करतात त्यामुळे त्या नोकरी करणाऱ्या व्यक्तीवर कामाचा जास्त ताण पडत नाही.

थोडक्यात वरील विवेचनावरून नोकरी करणाऱ्या महिलांच्या नोकरी करण्यामुळे घरच्या कामावर काही प्रमाणात का होईना परिणाम होत असल्याचे दिसून आले.

## I) नोकरी करणाऱ्या महिलांविषयीच्या घरातील पती तसेच अन्य कुटूंबातील व्यक्तिंच्या प्रतिक्रिया :-

नोकरी करण्यामुळे महिलांच्या बाबतीत घरातील पती अथवा अन्य कुटूंबातील व्यक्तिंच्या प्रतिक्रिया काय आहेत ? असा प्रश्न महिला उत्तरदात्यांना विचारला असता त्यांनी घरातील सर्वांच्या प्रतिक्रिया चांगल्या असल्याचे सांगितले.

काही महिलांच्या नोकरीमुळे घरच्या उत्पन्नात भर पडते. नोकरीतून मिळालेल्या पैशातून कौटुंबिक गरजा भागविण्यास मदत होते.

तसेच घरातील मुलांच्या शिक्षणाकडे, आरोग्याकडे चांगले लक्ष पुरविता येते.

थोडक्यात नोकरी करणाऱ्या सर्वच महिलांच्या बाबतीत कुटूंबातील सर्वांच्या प्रतिक्रिया चांगल्या असल्याचे मुलाखतीवरून दिसून आले आहे.

## J) सांस्कृतिक कार्यक्रमांचा महिलांवरील प्रभाव :-

सांस्कृतिक कार्यक्रम वर्षातून किती वेळा व कोणकोणते आयोजीत केले जातात ? असा प्रश्न महिला उत्तरदात्यांना विचारला त्यावेळी वेगवेगळ्या महिला संस्थांत काम करणाऱ्या महिलांनी आपापल्या संस्थेत कोणकोणते सांस्कृतिक कार्यक्रम आयोजीत केले जातात ह्याचे स्पष्टीकरण सांगितले. यामध्ये श्री वारणा महिला गृहउद्योग लिज्जत पापड केंद्र, श्री वारणा भगिनी मंडळ व श्री. वारणा महिला सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने वर्षातून अनेक वेळा सणा-समारंभाच्यावेळेस सांस्कृतिक कार्यक्रम आयोजीत केले जातात. यामध्ये वर्षभरातील महिलांचे सर्व सण साजरे केले जातात. उदा. वटपौर्णिमा, हरतालिका, नागपंचमी, कांदेनवमी, कोजागिरी पौर्णिमा, दसऱ्याच्या वेळी शारदोत्सव, गणेशोत्सव, मकर संक्रांतीचे हळदी-कुंकू इ. या सणांचे दिवशी सर्व महिला एकत्र येतात व वरील सण साजरे करतात.

श्री वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळ लि., वारणानगर (वारणा बझार) या संस्थेमध्ये मकर संक्रांतीचे वेळेस हळदी-कुंकू, वार्षिक सर्वसाधारण सभा, संस्थेचा वर्धापन दिन हे कार्यक्रम साजरे केले जातात. या दिवशी संस्थेच्या सर्व सभासद महिलांना निमंत्रण दिले जाते. या कार्यक्रमाच्या वेळेस विविध विषयावर व्याख्याने, चर्चासत्रे, शिबीरे आयोजीत केली जातात.

तसेच महिलांसाठी वक्तृत्त्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, स्लाईड शो, नवरात्रामधील विविध गुणदर्शन कार्यक्रम, नृत्य स्पर्धा, पाककृती स्पर्धा, रांगोळी स्पर्धा वेगवेगळ्या पदार्थांचे व उद्योगाचे प्रशिक्षण, महिला नेतृत्व शिबीर, फनिगेम्स्, आरोग्य विषयक व्याख्याने, महिलांची वैद्यकिय तपासणी यासारखे उपक्रम राबविले जातात.

यावरील विविध कार्यक्रमाच्या आयोजनामुळे महिलांच्यामध्ये नवीन आचार विचारांची देवाण-घेवाण होते. विचारात बदल घडून आलेले दिसून येतात. समाजामध्ये आपण कसे राहिले पाहिजे, आपण एकटे न राहता सामुहिक पद्धतीने आनंदाने जीवन व्यतीत केले पाहिजे याची ह्यांची जाणीव महिलांना होते. तसेच व्याख्याने, चर्चासत्रे यासारख्या विविध कार्यक्रमांच्या आयोजनांमुळे बाहेरील विश्वात इतरत्र काय चालले आहे याची जाणीव आम्हास होते. तसेच अशा कार्यक्रमांमुळे आमची सर्वसाधारण पातळी उंचावली आहे. अशी महिलांची भावना होत असल्याचे त्यांनी मुलाखतीतून सांगितले.

### K) <u>सहकारी संस्थांतील सहभागामुळे महिलांमध्ये आणि त्यांच्या कुटूंबात झालेले बदल</u> :-

नोकरीमुळे महिलांच्या स्वत: तसेच त्यांच्या कुटूंबात कांही बदल घडून आले आहेत काय ? कोणते ? असा प्रश्न महिला उत्तरदात्यांना विचारला होता. उत्तरदात्या महिलांच्या मुलाखतीतून सूचित होते की, सहकारी संस्थांमधील सहभागामुळे महिलांमध्ये फार काही महत्त्वाचे बदल घडून आलेले आहेत. यामध्ये महिलांचे स्वत:चे तसेच कुटूंबाचे राहणीमान सुधारले आहे. महिलांना वेळेचे महत्त्व पटले आहे. स्वत:च्या उपलब्ध वेळेचे नियोजन त्या करू लागल्या आहेत.

आरोग्याची स्वच्छता, टापटिपपणा, पैशाचा योग्य तो वापर, स्वावलंबी जीवन जगण्याची कला अवगत झाली आहे.

नोकरीतून मिळालेल्या पैशातून महिलांनी स्वत:साठी तसेच कुटूंबातील सर्व लोकांना लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंची खरेदी केलेली आहे. यामध्ये घरामध्ये टि. व्ही., रेडिओ, फ्रिज, वॉशिंग मशीन, फॅन, मोटर सायकल, कपाटे, भांडी, भांड्यांची कपाटे, सोन्याचे दाग-दागिने खरेदी केलेले आहेत. याशिवाय नोकरीतून मिळालेल्या पैशातून मुला-मुलींचे विवाह, त्यांचे उच्च शिक्षण इ. साठी पैशाचा वापर केला आहे.

तसेच कांही महिलांनी नोकरीच्या पैशातून बचतीची योजना चालू केली आहे. तसेच कांही महिलांनी आपल्या बचतीवर कर्ज घेऊन घर बांधणेसाठी जागा, फ्लॅट तसेच घर दुरूस्तीसाठी, घर बांधणेसाठी कर्ज घेतले आहे. याची परतफेड त्यांना मिळणाऱ्या पगारातून केलेली आहे. याशिवाय मिळालेल्या नोकरीच्या पैशातून महिलांनी चटणी कांडप मशीन, शेवया मशीन, घरगुती वह्या-पुस्तके बायडींग व्यवसाय इ. प्रकारचे व्यवसाय करण्यासाठी मशीनरीची खरेदी केलेली आहे.

एकंदरीत वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की, महिलांना मिळालेल्या या नोकरीच्या संधीमुळे त्यांचे स्वत:चे जीवन तर स्वावलंबी झालेले आहेच, याशिवाय त्यांच्या कुटूंबाला नोकरीमुळे फार मोठा मदतीचा हातभार लागलेला आहे.

मुलाखत पत्रिकेच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीचे वर्गीकरण आणि विश्लेषण वरील तीन विभागात करण्यात आले आहे. त्यावरून सहकारी संस्थांमुळे या संस्थांत नोकरी/मजुरी करणाऱ्या महिलांच्या व्यक्तीगत जीवनात, त्यांच्या वागण्या-बोलण्यात, त्यांच्या कुटूंबाच्या आर्थिक दर्जात आणि सामाजिक प्रतिष्ठेत बदल घडून आला आहे हे स्पष्ट होते.

या महिलांचा त्यांच्या कुटूंबातील दर्जाही सुधारला आहे अशी त्यांची भावना आहे. व्यापक समाज व्यवस्थेच्या दृष्टीने विचार करता सहकारी संस्थांनी महिलांना अर्थव्यवस्थेत सहभागी

होण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. यामुळे आर्थिक विकासात महिलांचे योगदान मिळणे शक्य झाले आहे. महिलांच्या दृष्टीने विचार करता सहकारी संस्थामुळे महिलांचे आर्थिक आणि सामाजिक सबलीकरण होण्यास मदत झाली आहे.

याशिवाय सहकारी संस्थामध्ये सहभागी झाल्यामुळे लोकशाही व्यवस्थेतील मूल्ये महिलांमध्ये बिंबवणे शक्य झाले आहे. परस्परांचा आदर राखणे, परस्परांना सहकार्य करणे, नागरी जीवनातील नियम पाळणे आदी गोष्टी आत्मसात करणे सहकारी संस्थांतील सहभागामुळे महिलांना शक्य झाल्या आहेत. साकल्याने विचार करता सहकारी संस्थांमधील सहभागामुळे स्त्रियांमध्ये वैचारिक विवेकीकरणाच्या प्रक्रियेला (Rationalisation of thinking process) चालना मिळाली आहे. सहकारी संस्था म्हणजे स्त्रियांच्या स्वयंसहभागातून त्यांचे आर्थिक आणि सामाजिक सबलीकरण घडवून आणणारी साधने आहेत असे म्हणता येईल.

पुढील प्रकरणात प्रस्तुत संशोधनाचा अहवालाचा सारांश आणि महत्वाचे निष्कर्ष मांडण्यात आलेले आहेत.

*****